# "शालेय विकासात शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका एक अभ्यास"

प्रभा खरटमोल

**प्रस्तावना**

प्राथमिक शिक्षण हे व्यक्तिमत्व विकासाचे समाजपरिवर्तनाचे आणि राष्ट्रीय विकासाचे एक प्रमुख व महत्वाचे साधन आहे.त्यामुळे प्राथमिक शिक्षणाची सुविधा सर्व बालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र राज्यात विविध योजना आणि उपक्रम सुरू केलेले आहेत.केंद्रशासनाच्या सर्व शिक्षा अभियान या महत्वाकांक्षी कार्यक्रमाच्या माध्यमातून प्राथमिक शाळांना भौतिक सुविधा विदयार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर विविध योजना शिक्षण प्रशिक्षणाचे राज्यव्यापी कार्यक्रम आणि शालेय व्यवस्थापनामध्ये स्थानिक समाजाचा सहभाग यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत.

स्थानिक स्तरावर पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, साक्षरता व निरंतर शिक्षणाचे नियोजन, संनियत्रण करण्यासाठी आणि स्थानिक समाजाचा शैक्षणिक प्रक्रियेत सक्रिय सहभाग राहण्यासाठी शा.नि.क.पी आर ई १०८७ /४१७९५९/ (८४२४)/प्रा.शि- १, दि.७ सप्टेंबर १९९१ अनुसार ग्रामशिक्षण समितीची स्थापना करण्यात आली आहे. तथापि स्थानिक स्तरावर औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाचे संनियंत्रण व पर्यवेक्षण याबाबत ग्रामशिक्षण समिती यांच्यामध्ये समन्वय राहण्यासाठी शासनाने संबंधित ग्रामपंचायतीच्या सरपंचांना ग्रामशिक्षण समितीचे पदसिध्द अध्यक्ष करणे व ग्रामशिक्षण समितीची पुनर्रचना करण्याचा निर्णय शा.नि.क.पी आर ई २००१/(२७६९)/प्रा.शि.-१, दि. १६ एप्रिल २००१ अनुसार घेतला आहे.व त्यानुसार प्रत्येक प्राथमिक शाळेकरिता व्यवस्थापनपरत्वे गावात ग्राम शिक्षण समिती गठित करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अ) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right Of Children To Free And Compulsory Education Act- 2009 (no.35, 2009) केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या दि.२७/८/२००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे.तसेच भारत सरकारच्या दि.१६□२□२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दि.१/४/२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमूद केले आहे.

समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जाऊ शकतात. यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबावदारी शासनाने स्वीकारली आहे.

शिक्षणाच्या विकासात लोकसहभाग रहावा यादृष्टीने राज्यातील प्रत्येक प्राथमिक शाळेकरिता व्यवस्थापनपरत्वे ग्रामशिक्षण समिती वार्ड शिक्षण समिती अथवा खाजगी शाळांच्या बावतीत शाळा समिती गठित करण्यात येते. या समित्या शाळांच्या भौतिक व शैक्षणिक विकासाच्या बावतीत महत्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यासाठी संबंधित शाळा समित्यांना शासनाने काही आर्थिक अधिकार कर्तव्य तसेच काही उत्तरदायित्वे प्रदान केलेली आहेत. समित्यांची कार्ये ब-याच प्रमाणात शाळांच्या विकासासाठी उपयुक्त आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अनुसार विनाअनुदानित शाळा वगळता उर्वरित सर्व शाळांसाठी शाळा व्यवस्थापन समिती ३० सप्टेंबर २०१० पूर्वी गठित करणे अनिवार्य झाले. उक्त अधिनियमान्वये सदर समितीकडे शाळेच्या कामकाजाचे संनियंत्रण सोपविण्यात आले असल्याने ग्रामशिक्षण समिती वॉर्ड शिक्षण समिती व शालेय समिती यांच्या रचनेत व कार्यात बदल करून शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली.या प्राथमिक शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी गठित करण्यात आलेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्याचा तुलनात्मक अभ्यास या संशोधनात करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची गरज व महत्त्व**

बालकाचे व्यक्तिमत्त्व हे घर, परिसर व शाळा या माध्यमांतून आकारास येत असते. बालकाचे व्यक्तिमत्त्व आकार घेत असताना घर व परिसर या ठिकाणी आपण पालक म्हणून काळजी घेतो. तशीच काळजी शिक्षक शाळेमध्ये घेत असतात. म्हणूनच शिक्षक व पालकांनी एकत्रित प्रयत्न केल्यास बालकाचे व्यक्तिमत्त्व अधिक चांगल्याप्रकारे फुलेल. हे लक्षात घेऊन प्रामुख्याने पालकांचा समावेश असलेल्या शाळा व्यवस्थापन समितीची तरतूद कायदयात करण्यात आली आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम् २००९ मधील भाग -चार् कलम २१ अनुसार प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली.अधिनियम लागू झाल्यानंतर कायम विनाअनुदानित शाळा वगळता सर्वच शाळांनी शाळा व्यवस्थापन समिती स्थापन केलेली आहे.

शासन निणर्यानुसार ठाणे जिल्हातील जिल्हा परिषद शाळा व महानगर पालिका शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीची स्थापन करण्यात आली.

ग्राम शिक्षण समिती व वार्ड शिक्षण समिती यांची रचना व कार्य आणि शाळा व्यवस्थापन समितीची रचना व कार्य यामध्ये शालेय विकासाच्या अनुषंगाने काही प्रमाणात बदल करण्यात आलेला आहे. या समितीची स्थापना नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत करावी तसेच समितीची पुनर्रचना दर दोन वर्षांनी करावी.

प्रस्तुत संशोधनात बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये शाळा व्यवस्थापनासाठी स्थापन करण्यात आलेल्या शाळा व्यवस्थापन समितीची शालेय विकासात भूमिका यांचा अभ्यास आणि जिल्हा परिषद शाळा व महानगर पालिका शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्याची तुलना सदर संशोधनात करण्यात आलेली आहे.

**संबंधित साहित्याचे सिंहावलोकन**

संशोधन करीत असताना विषया संदर्भात पूर्णतः संशोधन व्हावे या विषयासंबंधित इतर किती व कशाप्रकारे संशोधन केले आहे हे समजण्यासाठी पूर्वी झालेल्या कार्याचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

१.पंत वाय.आर.(१९८४) पीएच.डी. पंजाब विद्यापीठ, पंजाब. “शिक्षणात पालकांचा सहभाग, नेपालमधील ग्रामीण पालकांचा सामुहिक व सामाजिक सहभाग एक अभ्यास”.

सारांश - उद्दिष्टे ग्रामीण भागातील शाळेच्या गुणवत्ता विकासात समाजाचा सहभाग बघणे.शिक्षण क्षेत्रात विविध प्रकारे लोकांनी दिलेल्या सहभागचा अभ्यास करणे. निष्कर्ष - सर्व स्तरावरील लोक सहभागी होत नाहीत. निरक्षर व गरीब पालकांना शैक्षणिक सुविधांचा फायदा कमी प्रमाणात मिळाला. शाळेच्या गुणवत्ता विकासात समाजाचा संबंध महत्वाचा असतो.

२. सुल्हीमन ( पीएच.डी. १९८५) थायलंड, “थायलंड शाळांतील कार्यक्रमात पालकांचा सहभाग एक अभ्यास”.

सारांश - संशोधनाचे मुख्य उद्दिष्टय माध्यमिक विद्यालयातील पालकांच्या सहभागाचा अभ्यास करणे. निष्कर्ष -उच्चशिक्षित पालक शाळेच्या कार्यक्रमात सहभागी होतात. ग्रामीण पेक्षा शहरी भागातील पालक अधिक प्रमाणात शाळेच्या कार्यक्रमात सहभागी होतात.

३.डॉ.कल्पना चित्रे (पीएच.डी. २००३) यांनी, "बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयांमधील महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील अल्पाहार योजनेचा व त्याच्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास" यावर संशोधन केले.

सारांश - या संशोधनाची मुख्य उदिद्ष्टे सदर योजनेची वर्तमान वस्तुस्थिती व विदयार्थ्यांवरील परिणाम अभ्यासणे हे होते.संशोधनासाठी बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयांमधील अनुक्रमे ७० याप्रमाणे १४० शाळांची निवड करण्यात आली. या संशोधनात बृहन्मुंबई व ठाणे या शाळेतील सदर योजनेबाबत तुलनात्मक पध्दती वापरून सर्वेक्षणाव्दारे माहिती संकलित करण्यात आली.एकंदरीत अल्पाहार योजनेत तोटयापेक्षा फायदयाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे ही विदयार्थी प्रिय योजना आहे.सर्व प्रतिसादक या योजनेची आवश्यकता असल्याचे अभिप्राय देतात.उपस्थितीत वाढ व अवधान वाढते. अल्पाहारामुळे ठाण्यातील विदयार्थ्यांपेक्षा मुंबईतील विदयार्थ्यांची भूक काही प्रमाणात शमते.

४.डॉ गोपीनाथ पाटील (पीएच.डी. २००४) यांनी, "प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात ग्राम शिक्षण समितीची भूमिका" या विषयावर संशोधन केले.

सारांश - या संशोधनाची मुख्य उदिद्ष्टे ग्राम शिक्षण समितीचा पटनोंदणी गळती शालेय उपक्रम व सुविधा याबाबत असलेली भूमिका अभ्यासणे. सदर संशोधनासाठी मुरबाड व शहापूर या तालुक्यातील एकूण ३०० ग्राम शिक्षण समितीची निवड करण्यात आली. सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. निष्कर्ष - ग्राम शिक्षण समिती पटनोंदणीकडे विशेष लक्ष देते. शाळा मधून मिळर्णा या सुविधांविषयी पालकांना जागृत केले जाते.ग्राम शिक्षण समितीचे सदस्य शाळांना शैक्षणिक साहित्य पुस्तके व इतर आवश्यक साहित्य देतात.प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी विविध उपक्रम व कार्यक्रम राबवितात.

५.चोभे रवींद्र (२००६) पीएच.डी. पुणे विद्यापीठ, पुणे, "महाराष्ट्र शासनाच्या जून १९९७ च्या अध्यादेशानुसार कार्यान्वित झालेल्या पालक शिक्षक संघाच्या उद्दिष्टानुसार कार्याचा अहमदनगर जिल्हयातील माध्यमिक शाळांच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास करून उपाययोजना सुचविणे".

सारांश - या संशोधनाचे मुख्य उदिद्ष्टय पालक शिक्षक संघाविषयी जून १९९७ पासून २००४ पर्यन्त वेळोवेळी निघालेल्या परिपत्रकांचा अभ्यास करणे व अपेक्षित कार्याचा शोध घेवून अपेक्षित कार्य व प्रत्यक्ष यांची तुलना करणे.निष्कर्ष - १०० टक्के शाळांमध्ये एकूण विद्यार्थी संख्या व पालक शिक्षक संघ सदस्य संख्या यामध्ये तफावत आढळते. पालक शिक्षक संघाची शासनाच्या परिपत्रकांतील अपेक्षेप्रमाणे अंमलबजावणी झालेली दिसत नाही.

६.पाटील सुषमा (२००९) पीएच.डी. पुणे विद्यापीठ, पुणे, "नंदूरबार आदिवासी जिल्हातील शासकिय पोस्ट बेसिक आश्रमशाळेतील कुमारावस्थेतील विद्यार्थीनींच्या स्थगिती व गळतीची कारणे शोधणे".

सारांश - संशोधनाची उद्दिष्टे नंदूरबार आदिवासी जिल्हातील शासकिय पोस्ट बेसिक आश्रमशाळेतील कुमारावस्थेतील मुलींच्या शिक्षणाचा आढावा घेवून त्या संदर्भात सोयी व सुविधा सूचविणे. निष्कर्ष - इ.५वी ते ८वी पर्यंतच्या वर्गात एकूण ४० टक्के प्रमाणात विद्यार्थीनींची स्थगिती दिसून येते व गळतीचे प्रमाण ८० टक्के दिसते. ५वी पासून ज्या विद्यार्थीनीची गळती होते त्याची कारणे बालमजूरी दिसते असे एकूण ५७ टक्के प्रमाणात दिसते.त्यावरून पालकांची गरिबीची परिस्थिती व शिक्षणाविषयीचे अज्ञान मोठया प्रमाणात दिसते. पालकांची भटकंती १२ टक्के आहे.

७. डॉ भरत पवार (पीएच.डी. २०१४) "महाराष्ट/ राज्यातील ठाणे जिल्हातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या विकासात समाज सहभागाचा अभ्यास".

सारांश - संशोधनाची उद्दिष्टे प्राथमिक शाळेतील शाळा विकासात सहभागी माता पालक संघ, पालक शिक्षक संघ व शाळा व्यवस्थापन समिती यांचा वस्तुस्थितीचा अभ्यास करणे व त्यांच्या सबलीकरणासाठी उपाययोजना सुचविणे. सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. निष्कर्ष - माता पालक संघाची शाळांमध्ये स्थापना करण्यात आलेली आहे पण त्यांची सभा नियमित घेतली जात नाही. सदस्यांची उपस्थिती अनियमित असते. शाळा व्यवस्थापन समितीची सभा दर महिण्याला होत नाही. विदयार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता बाबत सभेत चर्चा केली जाते.

या विषया संदर्भात वरील प्रमाणे विविध संशोधन झालेले आहेत. पण बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील भाग-चार कलम २१ अनुसार प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये दिनांक ३० सप्टेंबर २०१० पूर्वी स्थापन करण्यात आलेल्या शाळा व्यवस्थापन समिती या विषयावर संशोधन झालेले नसून या विषयाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या संशोधन कार्याच्या सिंहावलोकनाने संशोधिकेला प्रस्तुत संशोधन विषयासंदर्भात शोध कार्य करताना योग्य प्रकारची दिशा मिळाली.

**संशोधन शीर्षक**

"शालेय विकासात शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका एक अभ्यास"

**संशोधनाचे ध्येय**

शालेय विकासात शाळा व्यवस्थापन समितीच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची चले**

स्वतंत्र चल - शालेय विकास.

परतंत्र चल - शाळा व्यवस्थापन समिती.

**संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या**

**१.शालेय विकास** - भौतिक सुविधा, आर्थिक सुविधा व मानवी संसाधनांचा वापर करून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता व शैक्षणिक विकासाचा दर्जा वाढविणे.

शालेय विकासांतर्गत पायाभूत भौतिक सुविधा उदा.शाळेची इमारत, स्वच्छतागृह, पाण्याची सुविधा, विदयुतीकरण, क्रीडांगण, ग्रंथालय, स्वयंपाकगृह व अशा प्रकारच्या आवश्यक भौतिक सुविधा पुरविणे. आर्थिक अधिकारात शाळेस प्राप्त विविध अनुदानाचा विनियोगावर देखरेख करणे.कर्तव्यात १०० टक्के पटनोंदणी, १०० टक्के उपस्थिती, शालाबाहय व दिव्यांग बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व टिकविणे, बालक शिक्षण हक्क कायदा, मध्यान्ह भोजन योजना, शाळांवर संनियंत्रण, प्रशासकीय कामकाज यांचा वापर करून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता व शैक्षणिक विकासाचा दर्जा वाढविणे.

**२.शाळा व्यवस्थापन समिती** - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील भाग - चार, कलम २१ अनुसार प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये, दिनांक ३० सप्टेंबर २०१० पूर्वी स्थापन करण्यात आलेली समिती.

ठाणे जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळांमध्ये शालेय विकासासाठी तसेच शाळांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी व प्रशासकीय कामासाठी ३० सप्टेंबर २०१० पूर्वी स्थापन करण्यात आलेली समिती.

**संशोधनाची उदिद्ष्टे**

१.प्राथमिक शाळेतील शालेय विकास आराखडा तयार करण्यात शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

२.प्राथमिक शाळेस प्राप्त आर्थिक निधी विनियोग, वार्षिक उत्पन्न व खर्चलेखे याबाबतची शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

३.प्राथमिक शाळेच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवण्यात शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

४.बालक शिक्षण हक्क कायदा संदर्भात शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

५.प्राथमिक शाळेतील बालकांची १०० टक्के पटनोंदणी व १०० टक्के उपस्थिती याबाबतची शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

६.शालाबाहय व दिव्यांग बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व टिकविणे याबाबत शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

७.प्राथमिक शाळेतील मध्यान्ह भोजन योजना या संदर्भात शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

८.प्राथमिक शाळेस पायाभूत भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

९.प्राथमिक शाळेतील प्रशासकीय कामातील शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

१०.शाळागृह, इतर शालेय बांधकाम, तसेच किरकोळ दुरूस्त्यांवर देखरेख याबाबत शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका अभ्यासणे.

११.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगरपालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची रचना व त्याच्या कार्याची तुलना करणे.

**संशोधनाच्या परिकल्पना**

१.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शालेय विकास आराखडा तयार करण्यातील सहभागात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

२.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शाळेस प्राप्त आर्थिक निधी विनियोग, वार्षिक उत्पन्न आणि खर्चलेखे या कार्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

३.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शाळेच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवण्याच्या कार्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

४.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीचा बालक शिक्षण हक्क कायदा संदर्भातील कार्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

५.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शाळेतील बालकांची १०० टक्के पटनोंदणी व १०० टक्के उपस्थिती याबाबतच्या कार्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

६.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शालाबाहय व दिव्यांग बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व टिकविणे याबाबतच्या कार्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

७.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शाळेतील मध्यान्ह भोजन योजना या संदर्भातील कार्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

८.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शाळेस पायाभूत भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

९.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शाळेतील प्रशासकीय कामाबाबत लक्षणीय फरक आढळून येत नाही.

१०.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शाळागृह, इतर शालेय बांधकाम, तसेच किरकोळ दुरूस्त्यांवर देखरेख याबाबतच्या कार्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

११.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा याच्यातील शाळा व्यवस्थापन समितीच्या रचनेत लक्षणीय फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने मुंबई विभागातील ठाणे जिल्हयाचा विचार केला आहे. ठाणे जिल्हयातील शहरी भागातील ठाणे शहर व कल्याण-डोंबिवली या शहरांचा तर ग्रामीण भागातील कल्याण व अंबरनाथ या तालुक्यांचा विचार केला आहे.अन्य शहरी वा ग्रामीण भागातील तालुक्यांचा येथे विचार केलेला नाही.

संशोधनात केवळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यातील शाळा व्यवस्थापन समितींचा विचार केलेला आहे. इतर कोणत्याही शाळेतील व्यवस्थापन समितींचा विचार केलेला नाही.

संशोधनात मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितींचा विचार केलेला आहे. हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराती वा अन्य माध्यमांच्या प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितींचा समावेश केलेला नाही.

संशोधिकेने ठाणे जिल्हयातील ठाणे व कल्याण-डोंबिवली या महानगर पालिका आणि कल्याण व अंबरनाथ या तालुक्यातील जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील शाळा व्यवस्थापन समितींचा विचार केला आहे.अन्य जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिकेतील प्राथमिक शाळा यांचा समावेश केलेला नाही.

**संशोधन अभिकल्प**

**प्रस्तूत संशोधनाची पध्दती**

प्रस्तुत संशोधनात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील व महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीच्या भूमिकेचा शालेय विकासावर होणा-या कार्याचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका व कार्याविषयी माहितीचे संकलन करण्यासाठी तसेच त्यांचा कार्याचा शालेय विकासावर व शैक्षणिक गुणवत्तेवर झालेला परिणाम अभ्यासण्यासाठी आणि महानगर पालिका प्राथमिक शाळा व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्याची तुलना करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे.

**न्यादर्श**

प्रस्तुत संशोधनात ठाणे जिल्हयातील ठाणे व कल्याण-डोंबिवली येथील एकूण महानगर पालिकांच्या प्राथमिक शाळांतील ६० टक्के याप्रमाणे अनुक्रमे ५४ व ३० आणि कल्याण व अंबरनाथ या तालुक्यातील एकूण जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतील ६० टक्के याप्रमाणे अनुक्रमे ७३ व ६८ याप्रमाणे एकूण २२५ शाळेतील शाळा व्यवस्थापन समितींचा समावेश करण्यात आलेला आहे.

नमुना निवडीसाठी सुलभ संभाव्यता न्यादर्श नमुना निवड तंत्राचा वापर करण्यात आला.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनात आवश्यक माहिती मिळविण्यासाठी पुढील संशोधन साधनांचा वापर करण्यात आला.

१.प्रश्नावली - १.शाळा व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष (पालक).
२.मुख्याध्यापक (सचिव).

२.मुलाखत - १.गटशिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकारी २.केंद्रप्रमुख.

३.निरीक्षणसूची - शाळा व्यवस्थापन समितीची सभा.

वरील सर्व संशोधनाची साधने संशोधिकेने स्वतः तयार केलेली वापरण्यात आली.

**माहिती विश्लेषणाची तंत्रे**

प्रस्तुत संशोधनातील माहितीचे विश्लेषण करण्यासाठी खालील वर्णनात्मक आणि अनुमानात्मक सांख्यिकी तंत्राचा वापर करण्यात आला.

१.वर्णनात्मक विश्लेषण

अ. केंद्रिय प्रवृत्तीची परिमाणे

ब. विचलनशीलतेची परिमाणे

२. अनुमानात्मक विश्लेषण

अ. 'टी' परीक्षिका

ब. मध्यमान

**संशोधनाचे निष्कर्ष**

१.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शालेय विकास आराखडा तयार करण्यातील सहभागात ०.०५ स्तरावर लक्षणीय फरक असल्याचे दिसून येते. याबावत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती ही महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती पेक्षा जास्त सक्रिय असल्याचे मध्यमानावरून दिसून येते.

२. आर्थिक विधी विनियोग आणि शाळेचे वार्षिक उत्पन्न व खर्चलेखे या संदर्भातील कार्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती व महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती दोन्ही समान प्रमाणात काम करत असल्याचे दिसून येते.शाळेस प्राप्त आर्थिक निधीवर लक्ष ठेवणे.निधीचा विनियोग करण्यास परवानगी देणे, खर्चलेखे पहाणे याबावत दोन्ही शाळा व्यवस्थापन समित्या समान प्रमाणात काम करत असल्याचे दिसून येते.

३. शाळेच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवण्याच्या कार्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती व महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती दोन्ही समान प्रमाणात काम करत असल्याचे दिसून येते. अर्थात शाळेस भेटी देणे, शाळेची गुणवत्ता तपासणे, भौतिक सुविधांची सदयस्थिती पाहणे, आढावा घेणे व शिक्षक अनियमितता, गैरवर्तन व वारंवार अनुपस्थिती याबावत दोन्ही शाळा व्यवस्थापन समित्या समान प्रमाणात काम करत असल्याचे दिसून येते.

४. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची बालक शिक्षण हक्क कायदा संदर्भातील कार्यात ०.०१ स्तरावर लक्षणीय फरक असल्याचे दिसून येते. वयानुरूप विद्यार्थी शाळेत दाखल करणे, बालक शिक्षण हक्क

कायदा संदर्भात आलेल्या अडचणी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सोडविणे. याबाबत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती पेक्षा महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती ही जास्त सक्रिय असल्याचे मध्यमानावरून दिसून येते.

५. शाळेतील बालकांची १०० टक्के पटनोंदणी व १०० टक्के उपस्थिती याबाबतच्या कार्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती व महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती दोन्ही समान प्रमाणात काम करत असल्याचे दिसून येते. अर्थात ६ ते १४ वयोगतातील सर्व बालकांच्या १०० टक्के पटनोंदणी बाबत सर्वेक्षण करणे, गैरहजर असणा-या मुलांना दररोज उपस्थित ठेवणे याबाबत दोन्ही शाळा व्यवस्थापन समित्या समान प्रमाणात काम करत असल्याचे दिसून येते.

६. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शालाबाहय व दिव्यांग बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व टिकविणे याबाबतच्या कार्यात ०.०१ स्तरावर लक्षणीय फरक असल्याचे दिसून येते. शालाबाहय मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सतत सर्वेक्षण करणे. त्यांच्या अनुपस्थितीची कारणे शोधणे, विशेष गरजा असणा-या बालकांना गरजेनुसार सोयी उपलब्ध करून देणे. याबावत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती पेक्षा महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती ही जास्त सक्रिय असल्याचे मध्यमानावरून दिसून येते.

७. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीचा शाळेस मध्यान्ह भोजन योजना या संदर्भातील कार्यात ०.०१ स्तरावर लक्षणीय फरक असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन आहार सकस मिळावा यासाठी प्रयत्न करणे. चव रजिस्टर पहाणे, अन्न शिजवून देणा-यांची निवड करणे. भोजनकक्ष व त्याची स्वच्छता, सुरक्षितता याकडे लक्ष देणे. याबावत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती ही महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती पेक्षा जास्त सक्रिय असल्याचे मध्यमानावरून दिसून येते.

८. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगर पालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीचा शाळेस पायाभूत भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात ०.०१ स्तरावर लक्षणीय फरक असल्याचे दिसून येते. लोकसहभागातून शाळेस पायाभूत भौतिक सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे. गावातील श्रीमंत व दानशूर व्यक्तीकडून निधी जमविणे. याबावत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती ही महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती पेक्षा जास्त सक्रिय असल्याचे मध्यमानावरून दिसून येते.

९. शाळेतील प्रशासकीय कामाबावतच्या कार्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती व महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती दोन्ही समान प्रमाणात काम करत असल्याचे दिसून येते. नियमित सभेला उपस्थित राहणे, शिक्षकांची अडचणी सोडविणे. शाळा व समाज यांच्यातील संबंध दृढ करणे. याबावत दोन्ही शाळा व्यवस्थापन समित्या समान प्रमाणात काम करत असल्याचे दिसून येते.

१०. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महानगरपालिका प्राथमिक शाळा यांच्यातील शाळा व्यवस्थापन समितीची शाळागृह इतर शालेय बांधकाम तसेच किरकोळ दुरूस्त्यांवर देखरेख याबाबतच्या कार्यात ०.०१ स्तरावर लक्षणीय फरक असल्याचे दिसून येते. देखभाल दुरूस्ती अनुदानाचा वापर त्याच कामासाठी करणे. शालेय बांधकाम तसेच किरकोळ दुरूस्तीवर लक्ष ठेवणे. याबावत फरक दिसून येतो.

११. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीची रचना व महानगर पालिका प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीची रचना यात फरक नसल्याचे दिसून येते. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अनुसार दोन्ही प्राधिकरणाच्या शाळेतील शाळा व्यवस्थापन समित्यांची रचना केल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१ ) डॉ.भिंताडे वि.रा. ः 'शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणेः नित्य नूतन प्रकाशन.

२ ) डॉ.घोरमोडे आणि डॉ.घोरमोड ः 'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे'नागपूरः विदया प्रकाशन.

३) डॉ. आगलावे प्रदिप ः'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे'नागपूरः विदया प्रकाशन.

४) Koul Lokesh ः'Methodology of Educational Research' New Delhi ः Vikash Publishing House pvt. Ltd.

५) Best and Kahn ः'Research In Education' New Delhiः PHI Learning pvt. ltd.

६)Mangal S. K. ः 'Statistics In Psychology And Education' New Delhi ः PHI Learning pvt. ltd

७) शालेय शिक्षण व बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम - २००९ शालेय शिक्षण व कीडा विभाग् मंत्रालय् महाराष्ट्र शासन.

८) शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण हस्तपुस्तिका शालेय शिक्षण व कीडा विभाग् मंत्रालय् महाराष्ट्र शासन.

**ज्ञानकोश**

1 Buch M. B.(1993 2000) ः Sixth survey of educational Research Vol I & II

**वेबसाईट**

www.google.com, www.eric.ed.gov, www.teacherplanet.com